11 FEB 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'सांख्यिकी'तर्फे कार्यशाळा संपन्न


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सांख्यिकी विभागाच्या वतीने दि. १० फेब्रुवारी रोजी 'स्टॅटिस्टिकल एक्सप्लोरेशन ऑफ रिअल प्रॉब्लेम्स' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमात सांख्यिकी या विषयाचा दैनंदिन जीवनातील आणि सामाजिक समस्या सोडवण्यासाठी होणारा वापर यावर सखोल चर्चा करण्यात आली.

सांख्यिकी विभागप्रमुख प्रा. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी निवृत्त प्राध्यापक अनिल गोरे यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना 'सॉफ्ट स्किल्स', संभाषण कौशल्य आणि गुगल व एआयचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला. केवळ पुस्तकी ज्ञान न मिळवता समाजाच्या प्रश्नांवर काम केल्यास व्यक्तिमत्त्व विकास होतो आणि नोकरीच्या संधीही वाढतात, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सांख्यिकी विषयाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, सांख्यिकी हा विषय मिठासारखा आहे, जसे मिठाशिवाय जेवण पूर्ण होत नाही, तसे सांख्यिकीशिवाय कोणत्याही विषयाची खोली समाजापर्यंत पोहोचू शकत नाही. त्यांनी कोल्हापुरी गुळाच्या संशोधनाचे उदाहरण दिले. जिथे ११४ गावांमधील माती, पाणी आणि पर्यावरणाच्या सांख्यिकीय डेटाचा अभ्यास करून कोल्हापुरी गुळाचे वैशिष्ट्य जगासमोर मांडले गेले. कार्यक्रमाचा समारोप डॉ. सुवर्णा गोडसे-पाटील यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. या कार्यशाळेला कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे आणि मुंबई यासारख्या विविध ठिकाणच्या विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली होती.

जनसंपर्क कक्ष
11 FEB 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजाच्या प्रश्नांवर काम केल्यास व्यक्तिमत्व विकास होतो

- शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत अनिल गोरे यांचे प्रतिपादन
- 'वास्तवातील समस्यांचे सांख्यिकीय अन्वेषण' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सांख्यिकी विभागाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत बोलताना निवृत्त प्राध्यापक अनिल गोरे. सोबत प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आदी.

**जनप्रवास : कोल्हापूर**

केवळ पुस्तकी ज्ञान न मिळवता समाजाच्या प्रश्नांवर काम केल्यास व्यक्तिमत्व विकास होतो आणि नोकरीच्या संधीही वाढतात, असा मोलाचा सल्ला निवृत्त प्राध्यापक अनिल गोरे यांनी विद्यार्थ्यांना दिला. शिवाजी विद्यापीठातील सांख्यिकी विभागाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठातील सांख्यिकी विभागाच्या वतीने १० फेब्रुवारी रोजी 'स्टॅटिस्टिकल एक्सप्लोरेशन ऑफ रिअल प्रॉब्लेम्स' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमात सांख्यिकी या विषयाचा दैनंदिन जीवनातील आणि सामाजिक समस्या सोडवण्यासाठी होणारा वापर यावर सखोल चर्चा करण्यात आली.

सांख्यिकी विभागप्रमुख प्रा. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी निवृत्त प्राध्यापक प्रा. अनिल गोरे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांनी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'सॉफ्ट स्किल्स', संभाषण कौशल्य आणि गुगल व एआयचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सांख्यिकी विषयाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, सांख्यिकी हा विषय 'मिठासारखा' आहे; जसे मिठाशिवाय जेवण पूर्ण होत नाही, तसे सांख्यिकीशिवाय कोणत्याही विषयाची खोली समाजापर्यंत पोहोचू शकत नाही. त्यांनी कोल्हापुरी गुळाच्या संशोधनाचे उदाहरण दिले, जिथे ११४ गावांमधील माती, पाणी आणि पर्यावरणाच्या सांख्यिकीय डेटाचा अभ्यास करून कोल्हापुरी गुळाचे वैशिष्ट्य जगासमोर मांडले गेले.

कार्यक्रमाचा समारोप डॉ. सुवर्णा गोडसे-पाटील यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

11 FEB 2026

तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ६९९ अभ्यासक्रमांचे निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवारी दोन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आजअखेर ६९९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. मंगळवारी सहा अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध सात परीक्षा केंद्रावर झाल्या असून परीक्षांसाठी ११२ विद्यार्थी उपस्थित होते.

11 FEB 2026

सकाळ

■ शाहू संगीत रजनी : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू संगीत रजनी. स्थळ : राम गणेश गडकरी सभागृह, पेटाळा. वेळ : सायंकाळी साडेपाच

11 FEB 2026
लोकमत

# कार्यशाळेला प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सांख्यिकी विभागाने मंगळवारी घेतलेल्या 'स्टॅटिस्टिकल एक्सप्लोरेशन ऑफ रिअल प्रॉब्लेम्स' या विषयावरील कार्यशाळेला प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेला पाच जिल्ह्यांतील विद्यार्थी उपस्थित होते. विभागप्रमुख प्रा. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. निवृत्त प्राध्यापक प्रा. अनिल गोरे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
11 FEB 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चित्रपट निर्मितीचा ध्यास बाळगा

## रणजित जाधव; बी. ए. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांशी संवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने चित्रपट निर्मितीचा अभ्यासक्रम सुरू करून कोल्हापूरची या क्षेत्रातील ओळख अधिक ठळक केली आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेत प्रचंड मेहनत घेऊन चित्रपट निर्मितीचा ध्यास बाळगावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे संचालक रणजित जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी महामंडळाच्या कार्यालयाला भेट दिली, यावेळी ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी यावेळी चित्रपट महामंडळाची संस्थात्मक संरचना समजून घेतली. चित्रपट निर्मितीतील संघटनात्मक आणि व्यावसायिक पैलूंची यावेळी माहिती देण्यात आली. जाधव म्हणाले, चित्रपट महामंडळाचे चित्रपट सृष्टीच्या विकासात मोठे योगदान आहे. कलाकार, तंत्रज्ञ, निर्माते व दिग्दर्शक यांच्या हक्कांसाठी महामंडळ नेहमीच प्रयत्नशील असते. चित्रपट निर्मितीसाठी शास्त्रीय प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. शिवाजी विद्यापीठाने ती सोय केल्याने विद्यार्थ्यांना आता चित्रपट निर्मिती करणे अधिक सुलभ बनले आहे.

दिग्दर्शक सतीश बिडकर म्हणाले, चित्रपट निर्मिती करत असताना चित्रपटाच्या सर्व तांत्रिक आणि अन्य बाबींची सखोल माहिती करून घ्या. आपली कलाकृती अधिकाधिक कलात्मक कशी होईल यावर विचार करणे गरजेचे आहे. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बाबासाहेब खाडे, अनुप जत्राटकर आदींनी अभ्यास भेटीचे नियोजन केले. व्यवस्थापक रवींद्र बोरगावकर यांनी स्वागत केले. यावेळी नम्रता गोडबोले, सिद्धेश मंगेशकर आदी उपस्थित होते.

11 FEB 2026

तरुण भारत

# विद्यापीठात आजपासून पोर्तुगाल चित्रपट महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा अधिविभाग, पोर्तुगाल वाणिज्य दूतावास आणि द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर कोऑपरेशन अँड लँग्वेज, लिस्बन, पोर्तुगाल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच 'फेस्त-इन'च्या सहकार्याने १४ व्या लुसोफोन चित्रपट महोत्सव आजपासुन प्रारंभ होत आहे. महोत्सवात पोर्तुगाल, ब्राझील, फ्रान्स, नेदरलँड्स, ग्रेट ब्रिटन व साओ टोमे अँड प्रिन्सिपे या देशांतील दर्जेदार लघुपट, माहितीपट, डॉक्यु-फिक्शन व फीचर फिल्म्सचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. लुसोफोन देशांतील सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि मानवी भावभावनांचे विविध पैलू या चित्रपटांतून प्रेक्षकांसमोर उलगडले जाणार आहे. हे चित्रपट प्रदर्शन विनामुल्य असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

11 FEB 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उत्तरपत्रिकांची 'ऑन स्क्रीन' तपासणी वाढणार

## विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची कार्यवाही; उन्हाळी सत्रात बीसीए, बीबीए अभ्यासक्रमांचा समावेश होणार

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबर आता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या उत्तपत्रिकांच्या ऑन स्क्रीन तपासणीचे प्रमाण वाढणार आहे. उन्हाळी सत्रात त्याची व्याप्ती वाढविण्याची तयारी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सुरू केली आहे.**



या परीक्षा मंडळाने ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये पहिल्यांदा उत्तरपत्रिकांची ऑन स्क्रीन तपासणीची सुरुवात केली. त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर पुढील सत्रांमध्ये टप्प्याटप्प्याने अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे प्रमाण वाढविण्यात आले. त्यामध्ये बी. फार्मसी, एम. फार्मसी, बी. टेक., एम. टेक., एमबीए., एमसीए (इंजिनिअरिंग), एमसीए (सायन्स), बी. एस्सी., एम. एस्सी. नॅनो सायन्स, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटअंतर्गत असलेल्या एमआरएस., एमएसडब्ल्यू, एम. टेक. आदी अभ्यासक्रमांचा समावेश होता. आता मार्च-एप्रिलमध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्रातील परीक्षांमध्ये बीसीए आणि बीबीए अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका ऑन स्क्रीन तपासणी करण्याची तयारी परीक्षा मंडळाकडून सुरू आहे. त्यामुळे या स्वरूपात तपासल्या जाणाऱ्या उत्तरपत्रिकांची संख्या सुमारे साडेचार लाखांवर पोहोचणार आहे.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- वर्षभरातील परीक्षांची एकूण संख्या - १६००
- उत्तरपत्रिकांची एकूण संख्या - ३० लाख
- ऑन स्क्रीन तपासणी होणाऱ्या उत्तरपत्रिका - ४ लाख

"मागील तीन सत्रांतील परीक्षांमध्ये उत्तरपत्रिकांची ऑन स्क्रीन तपासणी केली जात आहे. त्यात सध्या २८ अभ्यासक्रमांचा समावेश आहे. उन्हाळी सत्रात या अभ्यासक्रमांची व्याप्ती वाढविली जाणार आहे.

**- डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ.

### कमीतकमी वेळेत निकाल

- या प्रणालीमुळे परीक्षकांना त्यांच्या महाविद्यालय किंवा जवळच्या महाविद्यालयातून उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करता येत आहे. त्यांचा वेळ, प्रवास खर्च वाचत आहे. मूल्यमापन कामकाजातील गोपनीयता, अचूकता, गतिमानता वाढली आहे. कमीतकमी वेळेत निकाल जाहीर करणे परीक्षा व मूल्यमापन मंडळाला शक्य होत आहे.

### अशी होते उत्तरपत्रिकांची तपासणी

- या 'ओएसएम' प्रणालीमध्ये उत्तरपत्रिका स्कॅन करून ती 'पीडीएफ'मध्ये एक सांकेतिक क्रमांक देऊन परीक्षकांना त्यांच्या लॉगिनवरून उपलब्ध करून दिली जाते. परीक्षकाने लॉगिन केल्यानंतर त्याला रँडम पद्धतीने एक उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी उपलब्ध होते. मूल्यमापन करताना या प्रणालीमध्ये उपलब्ध असणाऱ्या प्रश्नपत्रिका, आदर्श उत्तरपत्रिका, प्रश्न निहाय गुण यांचा वापर परीक्षकांकडून केला जातो.

11 FEB 2026

तरुण भारत

# अ. भा. मराठी चित्रपट महामंडळाला मास कम्युनिकेशनची भेट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन आणि फिल्म विभागाने येथील अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या मुख्य शाखेला नुकतीच भेट दिली. भेटीदरम्यान चित्रपट महामंडळाकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महामंडळाकडून संचालक रणजीत जाधव, सतीश बिडकर प्रमुख व्यवस्थापक रवींद्र बोरगावकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सहयोगी शिक्षक अनुप जत्राटकर आणि बाबासाहेब खाडे उपस्थित होते. महामंडळाचे दैनंदिन प्रशासन, सभासद नोंदणी आणि चित्रपट सृष्टीतील शिस्त याची माहिती व्यवस्थापन प्रमुख रवींद्र बोरगावकर यांनी दिली. कलाकार संकटात असताना संस्था त्यांच्या पाठीशी खंबीरपणे कशी उभी राहते, यावर संचालकांनी प्रकाश टाकला. तांत्रिक मदत, कायदेशीर सल्ला आणि कलाकारांच्या विविध समस्यांचे निराकरणासाठी महामंडळ सातत्याने कार्यरत असते. नवोदित कलाकारांनी संस्थेबद्दल कोणतीही भीती न बाळगता एकत्र यावे आणि महामंडळाच्या मार्गदर्शनाखाली चित्रपट निर्मितीच्या प्रक्रियेत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

11 FEB 2026

लोकमत

# कुलगुरूपदासाठी आलेल्या ११५ अर्जांची छाननी पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी राज्यभरातून आलेल्या ११५ अर्जांची दोन दिवस चाललेली छाननी प्रक्रिया मंगळवारी पूर्ण झाली. ही छाननी प्रक्रिया सोमवार (९ फेब्रुवारी) आणि मंगळवार (१० फेब्रुवारी) अशी दोन दिवस पार पडली. आता पात्र २५ उमेदवारांची कच्ची यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी ११५ पात्रताधारकांनी अर्ज केले असून, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह एकूण १६ महिला उमेदवारांचा समावेश आहे. त्यामुळे या निवडीकडे संपूर्ण शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे. माजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण झाला होता. त्यापूर्वी नूतन कुलगुरूंची निवड होणे अपेक्षित होते. मात्र प्रक्रिया रखडल्याने सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा प्रभारी कार्यभार सोपवण्यात आला आहे. कुलपती कार्यालयाकडून नूतन कुलगुरूपदासाठी २३ डिसेंबर ते २७ जानेवारी या कालावधीत अर्ज मागविले होते. अर्ज प्रक्रियेस दोन दिवसांची मुदतवाढ दिली होती. अंतिम मुदतीपर्यंत ११५ अर्ज प्राप्त झाले. या प्रक्रियेसाठी भारतीय विद्यापीठ, कोईम्बतूर येथील गणित विभागाचे प्रा. एस. सरवनन यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती.

या अर्जांमध्ये शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य विभागाचे डॉ. श्रीकृष्ण महाजन, पत्रकारिता विभागाच्या डॉ. निशा मुडे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सागर डेळेकर, तसेच एस. एस. कोळेकर, डॉ. एस. व्ही. कोळेकर आदींचा समावेश आहे. छाननी पूर्ण झाल्यानंतर आता पात्र उमेदवारांची कच्ची यादी जाहीर करण्यात येईल. त्यावर हरकती मागविण्यात येणार असून, हरकतींचे निरसन करून अंतिम (पक्की) यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर निवड समितीकडून मुलाखती घेण्यात येऊन पाच उमेदवारांची नावे अंतिम केली जातील.

11 FEB 2026
तरुण भारत

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्राच्या परीक्षा सुरळीत


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. ३ नोव्हेंबर २०२५ पासून सुरळीतपणे सुरू असून परीक्षा प्रक्रियेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून काटेकोर उपाययोजना करण्यात येत आहेत. सोमवारी (दि. ९) **B.Sc., P.G. Diploma in Industrial Safety, M.B.A., M.A.** अशा एकूण ६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने ५ परीक्षा केंद्रांवर पार पडल्या. या परीक्षांसाठी २११ विद्यार्थी उपस्थित होते. सर्व केंद्रांवर परीक्षा शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्याची माहिती परीक्षा विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, आजच **B.Arch. (Sem. III Je IV), M.Sc. Industrial Chemistry (Sem. III Je IV), M.Sc. Analytical Chemistry (Sem. I, II)** या ६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर विद्यापीठाकडून एकूण ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल प्रसिद्ध करण्यात आले असून उर्वरित निकालही टप्प्याटप्प्याने जाहीर केले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक यांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठाने दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करूनच परीक्षा द्यावी, असे आवाहन केले आहे.

1 1 FEB 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आजपासून लुसोफोन चित्रपट महोत्सव

**● पोर्तुगाल, ब्राझील, फ्रान्स, नेदरलँड, ग्रेट ब्रिटनमधील लघुपट, माहितीपट, फीचर फिल्मस्‌चे प्रदर्शन होणार**



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा अधिविभाग, पोर्तुगाल वाणिज्य दूतावास व द कमॉईश इन्स्टिट्यूट फॉर को-ऑपरेशन अँड लँग्वेज, लिस्बन, पोर्तुगाल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच 'फेस्त-इन'च्या सहकार्याने बुधवार (दि. ११) पासून दोनदिवसीय १४ व्या लुसोफोन चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सव निलांबरी हॉल, वनस्पतिशास्त्र विभाग येथे होणार आहे.

बुधवारी दुपारी २ वाजता द कमॉईश इन्स्टिट्यूटचे डॉ. डेल्फिम कोरेईया द सिल्वा, गोवा यांच्या हस्ते महोत्सवाचा उद्घाटन समारंभ होणार आहे. त्यानंतर लगेच 'दि मेमरी ऑफ द स्मेल ऑफ थिंग्ज' आणि 'सुसुआराना' या चित्रपटांचे प्रदर्शन होईल. दि. १२ व १३ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ या वेळेत चित्रपट प्रदर्शन होईल. यामध्ये 'ओल्ड मॅन ऑफ रेस्तेलो', 'न्तेरेगू (दि अन्टेमेबल)', 'ब्युटिफुल बान्झो', 'आवर किंगडम', 'ब्युटिफुल अमेरिका', 'दि पोर्तुगीज', 'दि सोल्जर फ्रॉम गोवा', 'दि डेल्फिन' हे चित्रपट, माहितीपट व लघुचित्रपट दाखवले जाणार आहेत. चित्रपट प्रदर्शन विनामूल्य असून, विद्यार्थी, रसिक प्रेक्षकांनी महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

11 FEB 2026 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आजपासून पोर्तुगीज चित्रपट महोत्सवाचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा अधिविभाग, पोर्तुगाल वाणिज्य दूतावास आणि द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर को-ऑपरेशन अँड लँग्वेज, लिस्बन, पोर्तुगाल यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच 'फेस्त-इन'च्या सहकार्याने १४ व्या लुसोफोन चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दि. ११ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत वनस्पतीशास्त्र विभागातील निलांबरी हॉलमध्ये होईल.



या महोत्सवात पोर्तुगाल, ब्राझील, फ्रान्स, नेदरलँडस्, ग्रेट ब्रिटन व साओ टोमे अँड प्रिन्सिपे या देशांतील दर्जेदार लघुपट, माहितीपट, डॉक्यू-फिक्शन व फीचर फिल्म्सचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. लुसोफोन देशांतील सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि मानवी भावभावनांचे विविध पैलू या चित्रपटांतून प्रेक्षकांसमोर उलगडले जातील.

पोर्तुगीज भाषा ही जगातील पाचवी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून विविध संस्कृती, भाषा आणि समाज समजून घेण्याचे प्रभावी माध्यम आहे. हे चित्रपट प्रदर्शन विनामूल्य असून, कोल्हापुरातील विद्यार्थ्यांनी व रसिक प्रेक्षकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

11 FEB 2026

पुढारी

# 'लैंगिकता-जबाबदार वार्तांकन'वर आज विद्यापीठात कार्यशाळा

## पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात बुधवारी (दि. ११) 'लैंगिकता-जबाबदार वार्तांकन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. अध्यासनाच्या इमारतीत सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत ही कार्यशाळा होईल. कार्यशाळेत पुणे येथील 'प्रयास' संस्थेच्या संचालक डॉ. तृप्ती दरक 'लैंगिकता समजून घेताना' या विषयावर, तर पुण्यातील मानसिक आरोग्य समुपदेशक अबोली या 'लैंगिकता-जबाबदार वार्तांकन' या विषयावर मांडणी करणार आहेत. याप्रसंगी मानस संस्थेच्या अध्यक्षा स्मिता पवार, सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद आजगेकर उपस्थित राहणार आहेत. किर्लोस्कर ऑईल इंजिन, प्रयास आणि मानस या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले आहे.

कार्यशाळा सर्वांसाठी मोफत असून, यात सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 FEB 2026 सकाळ

# कुलगुरूपदासाठीच्या अर्जांची छाननी पूर्ण

## पुढील प्रक्रियेसाठी २५ उमेदवारांची निवड होणार

**समिती साधणार उमेदवारांशी संवाद**

**ज्या २५ उमेदवारांची नावे शॉर्टलिस्ट होतील, त्या उमेदवारांशी कुलगुरू शोध समितीतील सदस्य संवाद साधतील. त्यातून पाच उमेदवारांची नावे कुलपतींकडे अंतिम मुलाखत प्रक्रियेसाठी समिती सादर करणार आहे. ही प्रक्रिया लक्षात घेता मार्चमध्ये विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्याची शक्यता आहे.**

कोल्हापूर, ता. १० : दक्षिण महाराष्ट्राची ज्ञानगंगा असणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी निवड प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी इच्छुक असलेल्या सुमारे ११५ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया आज कुलगुरू शोध समितीकडून पूर्ण करण्यात आली. पुढील प्रक्रियेसाठी समिती २५ उमेदवारांची निवड करणार आहे.

विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाळ सहा ऑक्टोबर रोजी संपला. त्यानंतर जूनमध्ये कुलगुरू शोध समिती स्थापन झाली. या समितीने कुलगुरूपदासाठी इच्छुक असणाऱ्यांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया २३ डिसेंबर रोजी सुरू केली. समितीने दिलेल्या मुदतीत विद्यापीठ कार्यक्षेत्रासह राज्यातील साधारणतः ११५ उमेदवारांनी अर्ज केले. त्यात विद्यमान प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. एस. एस. चव्हाण, सागर डेळेकर, एस. एस. कोळेकर, के. एम. गरडकर, अनिल घुले, जी. बी. कोळेकर, आर. व्ही. गुरव, आर. जी. सोनकवडे, एस. एस. महाजन, ज्ञानदेव तळुले, निशा मुडे-पवार, एम. एस. देशमुख, रामचंद्र पवार, तर विद्यापीठाबाहेरील अन्य उमेदवारांमध्ये होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मुंबईतील नितीन देसाई, नितीन सरदेसाई आदींची नावे आहेत. या उमेदवारांच्या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया सोमवारी (ता. ९) आणि मंगळवारी (ता. १०) कुलगुरू शोध समितीकडून राबविण्यात आली. त्यात शैक्षणिक पात्रता, संशोधनातील कामगिरी, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात दिलेले योगदान आदींची पाहणी, तपासणी करण्यात आली. त्यातून समितीकडून २५ उमेदवारांची नावे शॉर्टलिस्ट केली जाणार आहेत.

11 FEB 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नृत्य-स्वरांच्या मैफलींनी मने प्रफुल्लित

## शाहू संगीत रजनीत मौसमी यांचे पदन्यास, अतुल खांडेकर यांचे स्वर

कोल्हापूर, ता. १० : कथ्थक नृत्यांगना मौसमी जाजू यांचे मनमोहक पदन्यास आणि शास्त्रीय गायक अतुल खांडेकर यांच्या सुरेल स्वरांतून प्रकटलेले राग मारू बिहागचे सौंदर्य, अशा नृत्य-स्वरांच्या मैफलींनी रसिकांची मने प्रफुल्लित केली. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे झालेल्या राजर्षी शाहू संगीत रजनीचा पहिला दिवस अशा दिमाखात साजरा झाला.

विद्यापीठाने आयोजित केलेल्या संगीत रजनीचे यंदा तिसरे वर्ष आहे. या रजनीचे उद्घाटन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले.

डॉ. जाधव म्हणाल्या, 'संगीत हे मानवी मनाला तसेच आरोग्याला शांतता व प्रसन्नता देणारे उपयुक्त शास्त्र आहे. माझ्यासारख्या वेगळ्या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या व्यक्तीसाठीही संगीत मनःशांती देणारे ठरते.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापिठा तर्फे आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनीत मंगळवारी कथ्थक नृत्य सादर करताना मौसमी जाजू.

कुलसचिव डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थीदशेपासून शास्त्रीय संगीत व नृत्याची आवड होती. विविध विषयांवर लेखन करताना संगीत ऐकल्याशिवाय मन प्रसन्न होत नाही.' यावेळी संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई तसेच पं. विनोद डिग्रजकर उपस्थित होते. पहिल्या सत्रात मौसमी जाजू (पुणे) यांनी कथ्थकद्वारे त्रिदेवी स्तुती सादर केली. तीनतालातील थाट, आमद, तोडे, तत्कार, विविध बंदिशी सादर करत नृत्याद्वारे कृष्णभजन सादर केले. उत्कृष्ट पदन्यासाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. त्यांना आशय कुलकर्णी (तबला), ज्ञानेश्वर अडील (पखवाज), शुभम खांडळकर (गायन) व यशवंत थिटे (संवादिनी) यांनी साथसंगत केली. दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध शास्त्रीय गायक अतुल खांडेकर (पुणे) यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी राग मारू बिहाग सादर करत विलंबित एकतालातील निबद्ध बंदिश मांडली. त्यानंतर मध्यलयीतील एकतालाचा तराणा सादर केला. पुढे राग मालकंसमध्ये मध्य, द्रुत व अध्या तीनतालातील 'मंगल मुरत मारूत' ही बंदिश सादर केली. भैरवी रागातील 'कारे ऐसी माया' संगीत नाटकातील नाट्यपदाने सांगता झाली. त्यांना प्रदीप कुलकर्णी (तबला) व सारंग कुलकर्णी (संवादिनी) यांनी साथ दिली.

### संगीत रजनीत आज

■ संगीत रजनीत बुधवार (ता. ११) रोजी पहिल्या सत्रात डॉ. सुधांशू कुलकर्णी व सारंग कुलकर्णी यांची संवादिनी जुगलबंदी होईल. दुसऱ्या सत्रात पंडित विजय कोपरकर (पुणे) यांचे शास्त्रीय गायन होणार आहे.

11 FEB 2026

पुण्यनगरी

# 'लैंगिकता-जबाबदार वार्तांकन' विषयावर आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात बुधवारी 'लैंगिकता-जबाबदार वार्तांकन' या विषयावर बुधवारी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. अध्यासनाच्या इमारतीत सकाळी ११ ते दु. ४ वाजेपर्यंत ही कार्यशाळा असेल. कार्यशाळेत पुणे येथील 'प्रयास' संस्थेच्या डॉ. तृप्ती दरक 'लैंगिकता समजून घेताना' या विषयावर, तर पुण्यातील मानसिक आरोग्य समुपदेशक अबोली या 'लैंगिकता-जबाबदार वार्तांकन' या विषयावर मांडणी करणार आहेत. यावेळी स्मिता पवार, शरद आजगेकर उपस्थित राहणार आहेत.

11 FEB 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठातील ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर - २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. आतापर्यंत ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल विद्यापीठाने जाहीर केले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्यावतीने प्रसिध्दी पत्रकातून दिली आहे. सोमवारी बीएस्सी, पी.जी. डिप्लोमा, एमबीए, एमए या ६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध ५ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून परीक्षांसाठी २११ विद्यार्थी उपस्थित होते. अखेर ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

जनसंपर्क कक्ष
1 1 FEB 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रागदारी सूर अन् नृत्याच्या नजाकतीने रंगली शाहू संगीत रजनी

## मौशमी जाजू यांचे कथ्थक नृत्य, अतुल खांडेकर यांचे शास्त्रीय गायन सादर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कथ्थक नृत्याचे पदलालित्य आणि रागदारी सुरांची उधळण अशा सांस्कृतिक कलांची गुंफण करत रंगलेल्या स्वरतालाच्या मैफलीत रसिकमन सुखावून गेले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभाग आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनी सोहळ्याचे. पुणे येथील मौशमी जाजू यांनी कथ्थक नृत्य, तर अतुल खांडेकर यांनी शास्त्रीय गायन सादर करत शाहू संगीत रजनीच्या पहिल्या दिवसाची सायंकाळ मंत्रमुग्ध केली. पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात शाहू संगीत रजनीला मंगळवारी प्रारंभ झाला असून, बुधवारी समारोप होणार आहे. संगीत रजनीचे यंदा तिसरे वर्ष आहे.

संगीत रजनीचे पहिले सत्र मौशमी जाजू यांच्या कथ्थक नृत्याने सुरू झाले. त्रिदेवी स्तुती सादर करत जाजू यांनी रसिकमनाचा ठाव घेतला. तीनतालातील परंपरेनुसार थाट, आमद, तोडे, तत्कार यामधून नृत्यातील बंदिशी सादर करत



कोल्हापूर : कथ्थक नृत्य सादर करताना मौशमी जाजू. (छाया : पप्पू अत्तार)

पदलालित्याची लयबद्ध अनुभूती दिली. आशय कुलकर्णी, ज्ञानेश्वर अंडील, शुभम खंडाळकर, यशवंत थिटे यांनी संगीत साथ मिळाली.

दुसऱ्या सत्रात शास्त्रीय गायक अतुल खांडेकर यांनी रागदारी स्वर छेडत सादर केलेल्या गायनाने रसिकांना खिळवून ठेवले. मारू बिहाग रागाने त्यांनी सुरुवात केली. विलंबित एकतालातील निबद्ध बंदिश सादर करत

**शाहू संगीत रजनी कार्यक्रमात आज**
**सत्र पहिले** : संवादिनी जुगलबंदी - सुधांशू कुलकर्णी व सारंग कुलकर्णी
**सत्र दुसरे** : शास्त्रीय गायन - पंडित विजय कोपरकर (पुणे)
**वेळ : सायंकाळी ५.३०**

शास्त्रीय सुरांची उधळण केली. त्यानंतर त्यांनी मध्यलय एकतालात गायलेला तराणा रसिकांची दाद मिळवून गेला. मालकंस रागातील मध्यलय तीनतालबद्ध मंगल मूरत मारुत या बंदिशीला स्वरसाज चढवला. भैरवी रागातील आणि 'कोणे एके काळी' या नाटकातील 'का रे ऐसी माया' या नाट्यपदाने खांडेकर यांनी या मैफलीची सांगता केली. प्रदीप कुलकर्णी, सारंग कुलकर्णी यांनी संगीत साथ दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 FEB 2026 जनप्रवास

# ड्रॉसोफीला जनुकीय अभ्यासावरील जयसिंगपूर कॉलेजमध्ये कार्यशाळा

**जनप्रवास : जयसिंगपूर**

येथील जयसिंगपूर कॉलेजमध्ये 'ड्रॉसोफीला संगोपन व जनुकीय अभ्यास' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा झाली. प्राणीशास्त्र विभागामार्फत डीबीटी स्टार कॉलेज योजनेंतर्गत व सायन्स सेंटर, कार्तिकचंद्र रॉय मेमोरियल ट्रस्ट, बनारस यांच्या सहकार्याने कार्यशाळेचे आयोजन केले होते.

कार्यशाळेत बनारस हिंदू विद्यापीठातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रो. डॉ. सुभाषचंद्र लखोटिया यांनी ऑनलाईन संवाद साधला. तसेच डॉ. जगतकुमार रॉय व डॉ. रिंचा आर्या यांनी विद्यार्थ्यांना ड्रॉसोफीलाच्या माध्यमातून मानवी जनुकीय अभ्यास, आरोग्य व रोग संशोधनातील महत्त्व स्पष्ट केले. प्रयोगशाळेत ड्रॉसोफीला संगोपन व वर्तन अभ्यासाचे प्रात्यक्षिकही सादर केले. कार्यशाळेत सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील २० विद्यार्थी व १३ शिक्षक सहभागी झाले. कार्यशाळेचा सांगता समारंभ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील प्रा. डॉ. आशिष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.



जयसिंगपूर कॉलेजमध्ये डॉ. जगतकुमार रॉय यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. सुरत मांजरे.

कार्यशाळेसाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष अडदंडे, सचिव डॉ. महावीर अक्कोळे, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य डॉ. सुरत मांजरे, डीबीटी समन्वयक डॉ. संदीप साबळे, डॉ. सचिनकुमार पाटील, प्रा. अर्चना धांदले, डॉ. स्वप्नील पोवार, प्रा. विकास जाधव, प्रा. धनश्री खडके, प्रा. ईश्वर मठपती आदींचे सहकार्य लाभले.